MHAH250003892026

**<u>दिवाणी दावा क्रं.१२०/२०२६ मधील निशाणी ०५ वरील आदेश</u>**

**(मन्सुर शेख व इ. वि. मजनु शेख)**

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १, २ प्रमाणे तहसीलदार यांच्याकडील रस्ता केस नं.१८१/२०२२ मध्ये दिनांक १८/१२/२०२५ रोजी झालेला निकाल हा दाव्याचा निकाल होईपावेतो स्थगीत ठेवावा तसेच प्रतिवादी यांनी वादीच्या शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळणेकामी दिलेला आहे.

२. वादीच्या अर्जातील कथन की, सदरचा दावा वादींनी प्रतिवादीविरुध्द जाहीर ठराव तसेच निरंतर ताकीद मनाई हुकुमासाठी आणि इतर तदणुषंगीक दादी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. मौजे राळेगण थेरपाळ येथील गट नं.२५४ पैकी ०हे.०४आर क्षेत्र हे वादी यांचे स्वतंत्र खरेदी मालकी वहिवाटीचे आहे. सदर खरेदीखताप्रमाणे वादी यांच्या नावाची नोंद फेरफार क्र.१२७७ प्रमाणे झालेली आहे. वादी यांनी घेतलेल्या क्षेत्रावर शेतीवस्ती बनविलेली आहे. सदरचा संपुर्ण गट हा पुर्व–पश्चिम लांबीचा असुन गटाचा मध्यावरुन पिंपळनेर ते राळेगण थेरपाळ दक्षिण–उत्तर असा रोड गेलेला आहे. तसेच सदरील गटाच्या पुर्वबाजुला उत्तर–दक्षिण असा कॅनॉल गेलेला असुन कॅनालच्या पश्चिम बाजुला उत्तर–दक्षिण असा कॅनॉल रस्ता होता. वादी यांच्या मालकीचे क्षेत्र हे गट नं.२५४ च्या क्षेत्रातुन पिंपळनेर ते राळेगण थेरपाळ गेलेल्या

रोडच्या पुर्व बाजुला आहेत. सदर गट नं.२५४ चे उत्तर बाजुला गट नं.२५३ ही मिळकत असुन सदर मिळकतीमध्ये एक मशीद आहे. तसेच गट नं.२५४ च्या दक्षिण बाजुस गट नं.२५५ हा आहे. प्रतिवादी यांच्या मालकीच्या क्षेत्रामधुन म्हणजेच गट नं.२५४ च्या दक्षिण बाजुने प्रतिवादी यांना कॅनॉल रोडपर्यंत जाण्या येण्याकरीता वहिवाटीचा रस्ता अस्तित्वात होता. सदर कॅनॉल रोड रस्ता हा पुढे गट नं.२५३ ला लागुन आहे. गट नं.२५३ च्या दक्षिण बाजुने मशीदला जाण्यासाठी रस्ता कॅनॉल रोडपर्यंत गेलेला आहेत. लोक याच गट नं.२५३ च्या दक्षिण बाजुने व पिंपळनेर ते राळेगण थेरपाळ रोडने मशिदीमध्ये ये–जा करीत होते.

३. वादींचे पुढे असे कथन की, दरम्यानच्या काळात प्रतिवादी यांनी तहसिलदार पारनेर यांच्याकडे रस्त्यासाठी अर्ज दाखल केला. प्रतिवादीनी सदर अर्जात खोटी कथने केली. तसेच प्रतिवादीना त्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे कोणताही रस्ता कधीही अस्तित्वात नव्हता. तरी देखील प्रतिवादीने तश्या आशयाचा तथाकथीत अर्ज देऊन मुळ वादीची दिशाभुल करुन तहसीलदार यांच्याकडून दिनांक १८/१२/२०२५ रोजी खोटा आदेश मिळविला. त्याची माहिती व समज ही वादी यांना दिनांक १३/०२/२०२६ रोजी तलाठी यांच्या मार्फत मिळाली. सदर मुळ अर्जावर चौकशी होऊन चौकशी अंती तहसीलदार यांनी चुकीचा निष्कर्ष काढुन चुकीच्या तरतुदींचा आधार घेऊन अधिकाराचा चुकीचा वापर करुन दि.०८/०७/२०२२ रोजी निर्णयाकरीता प्रकरण बंद करुन अचानक पणे दि.२२/०२/२०२४ रोजी पंचनामा, कच्चा नकाशा केला आणी अचानकपणे दिनांक १८/१२/२०२५ रोजी चुकीचा निर्णय

दिलेला आहे.

४. वादींचे पुढे असे कथन की, वास्तविक वादी यांनी जमीन घेतल्यावर त्या ठिकाणी बांधकाम देखील केलेले आहे. त्या बांधकामाला ग्रामपंचायत मिळकत नं.७५६ असा मिळाला आहे. तसेच सदरच्या ००.०४.००आर मिळकती मध्ये वादी यांचा गायांचा गोठा व शेळयांचा गोठा बनविलेला आहे. तसेच सदरच्या जागेला बंदिस्ती देखील केलेली आहे. तसेच वादी नं.१ यांच्या कुटुंबात २ मुले व वादी नं.२ यांना ३ मुले आहेत त्याप्रमाणे सर्वच तिथे राहत असुन त्यांना ही जागा सोडुन दुसरे आश्रयाचे कोणतेही ठिकाण नाही.

५. वादींचे पुढे असे कथन की, प्रतिवादी हे रस्ता केस नं.१८१/२०२२ च्या दिनांक १८/१२/२०२५ रोजीच्या निकालाप्रमाणे निकालाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने तसेच ऐन–केन प्रकारे वादी यांना जमिनीतुन हुसकावुन लावण्याच्या दृष्टीने प्रयत्न करत आहेत. दि.१३/०२/२०२६ रोजी वादीच्या शांततामय कब्जे वहिवाटीस प्रतिवादी यांनी हरकत अडथळा केला व जेसीबी आणुन जाणीवपुर्वक वादीचे बांधकाम तोडण्याचा प्रयत्न केला. याबाबत प्रतिवादी यांना वादी यांनी समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला असता प्रतिवादी यांनी वादी यांचे काही एक ऐकले नाही. तहसिलदार यांच्या आदेशाप्रमाणे प्रतिवादी हे निकालाची कधीही अंमलबजावणी करतील यामुळे वादीला न्याय हक्कापासुन वंचीत राहवे लागेल. वादीचे कशानेही न भरुण येणारे असे नुकसान होईल. तसेच बेकायदेशीर पध्दतीने व चुकीच्या पध्दतीने झालेल्या निर्णयाला बळ मिळेल. त्यामुळे तहसीलदार यांच्याकडील रस्ता केस नं.१८१/२०२२

मध्ये दिनांक १८/१२/२०२५ रोजी झालेला निकाल हा दाव्याचा निकाल होईपावेतो स्थगीत ठेवावा तसेच प्रतिवादी यांनी वादीच्या शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये असा प्रतिवादी यांचे विरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम देण्याची विनंती केली आहे.

६. प्रतिवादीनी त्यांचे लेखी म्हणणे निशाणी क्र.१७ वर दाखल करुन वादीच्या अर्जास आक्षेप घेतला की, वादीतर्फे दिलेल्या अर्जात मिळकतीचे वर्णन नमुद नाही. वादीतर्फे दिलेल्या अर्जात रस्ता केस नं.१८१/२०२२ बाबत तहसीलदार यांनी दिलेल्या निकलावर स्थगिती मागितली असुन सदर निकालावर वादी यांना उपविभागीय अधिकारी यांच्याकडे न्याय मागणे न्यायोचीत होते. वादीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादीने कधीही हरकत अडथळा केला नाही. वादीने सदर नि.५ च्या अर्जात मिळकत गट नं.२५३ व २५५ बाबत उल्लेख केला असुन सदर गटातील सहहिस्सेदारांना दाव्यात मुद्दामहुन सामील केले नाही जेणेकरुन न्यायालयासमोर दावा मिळकतीची वस्तुस्थिती येवु शकणार नाही. वादीच्या अर्जात विसंगती आहे. सबब वादीचा नि.५ चा अर्ज vague unspecified lack of factual certainty असुन वादीची नि.५ मधील विनंती specified नसुन विसंगत असल्याने सदरचा अर्ज lack of specific prayer असल्याने no prayer, no relief म्हणुन फेटाळण्यात यावा व सदर दावा प्रतिवादीची कैफियत आल्यानंतर गुणदोषावर चालविणेत यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

७. प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्याकरता खालील मुद्दे माझ्या विचाराधीन

झाले आहेत व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह दिले आहेत.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींच्या बाजूने सुकृतदर्शनी प्रकरण असल्याचे वादी सिध्द करतात का? | **होकारार्थी** |
| २. | अनुकुलतेचा कल वादींच्या बाजुने आहे काय? | **होकारार्थी** |
| ३. | तात्पुरता मनाई हुकुम नाकारल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल असे वादी सिध्द करतात का? | **होकारार्थी** |
| ४. | अंतिम आदेश काय? | **अर्ज मंजुर करण्यात आला.** |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्रमांक १ ते ३ करिता**

८. उपरोक्त वाद प्रश्न हे एकमेकांशी निगडीत असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरिता ते एकत्रीतपणे चर्चे करिता घेतले आहेत.

९. वादींनी त्यांच्या दाव्याच्या पृष्ठयर्थ नि.३ वर तहसिलदार पारनेर यांचेकडील रस्ता केस नं.१८१/२०२२ ची संपुर्ण फाईलची प्रमाणीत प्रत, तहसिलदार पारनेर यांच्या निकालाच्या समजची पोहच पावतीची छायांकीत प्रत, नोंदणीकृत खरेदीखत क्र.२४६२/२००२ ची छायांकीत प्रत, ग्रामपंचायत मिळकत क्र.७५६ चा कर आकारणी उतारा, दिवाणी दावा क्र.४४/२०२२ मधील निशाणी क्र.१ ची छायांकीत प्रत, मंडळाधिकारी यांनी पाठविलेली दिनांक १३/०३/२०२६ रोजीच्या नोटीसची मुळ प्रत व गुगल मॅप नकाशाची डिजीटल प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केली

आहेत. याउलट प्रतिवादीनी त्यांच्या कथनाच्या पुष्ठयर्थ कुठलेही कागदपत्रे दाखल केली नाही.

**१०.** वादींचे विधीज्ञ श्री. जे. ए. शेख व प्रतिवादींचे विधीज्ञ श्री. एस. एस. पठारे यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही विद्वान विधीज्ञांनी त्यांच्या अर्जातील व लेखी म्हणण्यातील कथनांचा पुनःउच्चार केला.

**११.** अर्जाचे व अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. पटलावर दाखल केलेल्या कागदपत्रांच्या आधारे दिनांक ११/०७/२००२ रोजी दावा मिळकत ही वादी क्र.१ व २ यांनी प्रतिवादीच्या वडिलांकडून नोंदणीकृत खरेदीखत क्र.२४६२/२००२ अन्वये ५०,०००/- रुपयात खरेदी घेतल्याचे दिसुन येते. सदर खरेदीखता अन्वये वादीच्या ग्रामपंचायत दप्तरी लागुन वादी हे सदर मिळकतीचा कर भरत असल्याचे प्रथमदर्शणी दिसुन येते. त्यामुळे उपलब्ध कागदोपत्री पुराव्याच्या आधारे प्रथमदर्शणी वादी हे दावा मिळकतीचे कब्जेदार असल्याचे दिसुन येते.

**१२.** अभिलेखावर दाखल रस्ता केस क्र.१८१/२०२२ च्या संचीकेचे अवलोकन केले असता प्रतिवादीने वादी विरुध्द त्यांच्या गट क्र.२५४ मधील जमिनीत जाण्याकरीता रस्ता मोकळा करुन देण्यासाठी सदर केस दाखल केल्याचे दिसुन येते. सदर केसमधील प्रतिवादीच्या अर्जाचे अवलोकन केले असता प्रतिवादीने पुर्वापार असलेल्या १२ फुट रुंदीचा रस्ता वादीने बंद केला असुन तो रस्ता मोकळा करुन देण्याकरीता अर्ज दाखल केल्याचे दिसुन येते. परंतु पुढील संचीकेचे अवलोकन केले असता तहसीलदार यांनी प्रतिवादीचा सदर अर्ज हा महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम

१९६६ च्या कलम १४३ नुसार दाखल केल्याचे गृहीत धरल्याचे दिसुन येते.

**१३.** वादीच्या विद्वान विधीज्ञांनी युक्तिवाद केला की, जर तहसिलदार यांनी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ च्या कलम १४३ नुसार आदेश पारीत केला असेल तर त्यांना अडथळा काढुन देण्याचा आदेश पारीत करता येणार नाही. कारण पुर्वापार चालत असलेल्या रस्त्यावरील अडथळा दुर करण्याचा अधिकार केवळ मामलतदार यांना मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ च्या कलम ५ खाली दाखल केलेल्या अर्जातच आहे. त्यामुळे तहसिलदार यांनी पारीत केलेल्या आदेश हा मुळातच बेकायदेशीर आहे. त्यामुळे सदर आदेशाची अंमलबजावणी झाल्यास वादीचे अपरिमित असे नुकसान होईल. वादीच्या विद्वान विधीज्ञांनी पुढे युक्तिवाद केला की, तहसिलदार यांनी पारीत केलेल्या सदर आदेशा विरुध्द ते दिवाणी न्यायालयात दाद मागु शकतात. तसेच दिवाणी न्यायालय हे तहसिलदार यांनी पारीत केलेल्या आदेशास स्थगीती देऊ शकते. त्यांच्या युक्तिवादाच्या पुष्ठयर्थ त्यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई यांच्या खालील न्यायनिवडायांचा आधार घेतला आहे.

**1) Dagadu S/o Laxman Bangal & Ors. Vs. SDO & Ors. (Writ petition No.10707 of 2021 dated 23/02/2023.**

**2) Vimal w/o Bhausaheb Nabde Vs. Sub Divisional Officer, Ahmednagar & Ors. (2026(1) Mh.L.J.218)**

**१४.** महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ च्या कलम १४३ चे अवलोकन केले असता तहसिलदाराच्या आदेशा विरुध्द दिवाणी न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार सदर कलमामाध्येच नमुद केला आहे. त्यामुळे वादीला

तहसिलदारांच्या निकालाविरुध्द उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अपील न करता दावा दाखल करता येणार नाही असे म्हणणे उचीत होणार नाही. वादीच्या विद्वान विधीज्ञांनी दाखल केलेल्या मा.उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयाचे अवलोकन केले असता मा.उच्च न्यायालयाने सदर निकालात तहसिलदार यांच्या महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ च्या कलम १४३ खालील अर्ज विचारात घेता असतानाचे अधिकार व मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ खालील अर्ज विचारात घेता असतानाचे अधिकार या मधील फरक दर्शविला आहे. सदर निकालाअन्वये महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ च्या कलम १४३ खालील अर्ज निकाली काढताना तहसिलदार यांना अडथळे दुर करण्याचे निर्देश देता येणार नाही. तसेच दिवाणी न्यायालयास तहसिलदार यांच्या दिलेल्या आदेशावर स्थगती देण्याचा अधिकार आहे याबाबी मा.उच्च न्यायालयाने स्पष्ट केल्या आहेत.

**१५.** प्रतिवादीच्या विद्वान विधीज्ञांनी युक्तिवाद केला की, वादी यांनी त्यांच्या दाव्यात किंवा अर्जात प्रतिवादी यांनी वादीच्या दावा मिळकतीवरील कब्जे उपभोगास हरकत अडथळा केला असल्याची बाब नमुद केली नाही. त्यामुळे त्यांच्या मते वादी यांना मनाई हुकुम मागण्याचा अधिकार नाही. परंतु दाव्याचा परिच्छेद क्र.७ चे अवलोकन केले असता त्यात प्रतिवादीनी तहसिलदार यांच्या आदेशाचा आधार घेऊन वादी यांच्या दावा मिळकतीचा नासधुस करण्याचा प्रयत्न केल्याची बाब नमुद केली आहे. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी यांच्या कडून होणारा अडथळा दाव्यात किंवा अर्जात नमुद केला नाही असे म्हणता येणार नाही.

१६. अभिलेखावर दाखल रस्ता केस क्र.१८१/२०२२ च्या निकाल पत्राचे अवलोकन केले असता तहसिलदार यांच्या आदेशामध्ये अनुक्रमांक २ वर त्यांनी गट क्र.२५४ मध्ये जाण्या येण्यासाठी प्रस्तुत दाव्यातील वादी यांनी केलेला अडथळा तात्काळ काढुन घ्यावा असे आदेश पारीत केल्याचे दिसुन येते. वर केलेल्या विवेचनाआधारे अडथळा दुर करण्याचा आदेश तहसिलदार यांना महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ च्या कलम १४३ खाली चालविण्यात आलेल्या अर्जात पारीत करता येत नाहीत. त्यामुळे प्रथमदर्शणी तहसिलदार यांनी पारीत केलेला आदेश हा कायद्यास अनुसरुन आहे असे म्हणता येणार नाही. अभिलेखावर दाखल खरेदीखत व कर उतारा या दस्ता आधारे वादी हे दावा मिळकतीच्या कब्जे उपभोगात असल्याचे प्रथमदर्शणी दिसुन येते. त्यामुळे वादींच्या बाजुने प्रथमदर्शणी केस असल्याचे सिध्द होते. त्यामुळे न्यायाचा समतोल हा देखील वादींच्या बाजुने आहे. वादी यांनी दाखल केलेल्या नोटीस नुसार तहसिलदार यांच्या सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक २५/०३/२०२६ करण्याचे नियोजील्याचे दिसुन येते. त्यामुळे सदर आदेशाची अंमलबजावणी झाल्यास वादीचे अपरिमित असे नकुसान होईल. त्यामुळे वादी हे त्यांनी मागणी केल्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे तहसीलदार यांच्याकडील रस्ता केस नं.१८१/२०२२ मध्ये दिनांक १८/१२/२०२५ रोजी झालेला निकाल हा दाव्याचा निकाल होईपावेतो स्थगीत ठेवावा तसेच प्रतिवादी यांनी वादीच्या शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकुम देणे न्यायोचित ठरेल. सबब, वरील कारणमिमांसेवरुन वादी हे तुर्तातुर्त मनाई

हुकुमाची दाद मिळण्यास पात्र ठरत असल्याने मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करिता</u>**

**१७.** वरील सर्व बाबींचा विचार करुन मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर मी होकारार्थी दिले असल्यामुळे मुद्दा क्र.०४ च्या अनुषंगाने खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**१.** वादीचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

**२.** दाव्याचा निकाल लागेपर्यंत तहसीलदार यांनी रस्ता केस नं.१८१/२०२२ मध्ये दिनांक १८/१२/२०२५ रोजी पारीत केलेला निकाल हा स्थगीत राहिल तसेच प्रतिवादी यांनी वादीच्या दावा मिळकतीवरील शांततामय कब्जे वहिवाटीस स्वतः किंवा हस्ताकांमार्फत हरकत अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकुम देण्यात येतो.

**३.** अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट.

KANAKDANDE SHRIHARI
Digitally signed by KANAKDANDE SHRIHARI
Date: 2026.03.24 18:13:20 +0530

(एस.आर.कनकदंडे)

दिनांकः– २४/०३/२०२६

**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर**
**पारनेर, जि.अहमदनगर.**